३८३

४

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४
:- -022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com

**कार्यालयीन आदेश क्रमांक ५ दिनांक ६ JAN 2010**

विषय:- ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करतांना घ्यावयाची दक्षता.

ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण केल्यानंतर लेखापरीक्षण अहवाल त्वरीत निर्गमित करणेबाबत सर्व संबंधित लेखापरीक्षकांची उदासिनता दिसून येते. तसेच याबाबत योग्य ते नियंत्रण ठेवण्यात येत नाही. त्यामुळे ग्रामपंचायत लेखापरीक्षण करूनही लेखापरीक्षण अहवाल वेळीच निर्गमित न झाल्यास केलेल्या लेखापरीक्षणास काही अर्थ रहात नाही. त्यामुळे सर्व संबंधितांना असे सूचित करण्यात येते की, ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आलेनंतर नियमानुसार दोन महिन्यात लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करण्यात यावा. लेखापरीक्षण अहवाल वेळेत निर्गमित न झाल्यास त्यासाठी जबाबदार असणा-या लेखापरीक्षक यांच्यावर नियमाअंतर्गत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. विहित मुदतीत अहवाल सादर न केल्यास त्यांना पुढील लेखापरीक्षणाचे कार्यक्रम देण्यात येऊ नयेत. प्रलंबित लेखापरीक्षण अहवाल अशा कर्मचा-यांनी अनुज्ञेय रजा कालावधीत पूर्ण करावेत.

त्याचप्रमाणे ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल त्वरीत व निश्चित स्वरुपात संबंधितांना पोहोच होण्यासाठी ते `अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींग` पध्दतीने पाठविण्यात यावे.

(माणिक कौरथी)
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य

प्रत:-

१. सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा,
मुंबई / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा,
जिल्हा -----------------.

वि com hcl ASA letter १११०